# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

**फोन नं २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in**


जा क्र. तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१५-१६/ 139 दिनांक ११/१/२०१६ 2016

प्रति,

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/कराड/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/अवसरी

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड/पुणे/अवसरी.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड/म. रा. हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे.

कुसरो वाडीया इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे.

विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे अर्ज तपासणी करणेबाबत. (पदवी/पदव्युत्तर पदवी/पदविका)

संदर्भ :- मा. संचालक, तंत्राशिक्षण मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१५-१६ /२१८/१६/१२/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की वरील संदर्भाधीन पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करीता अर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे अर्ज खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थाकडून आपल्या कडे तपासणीसाठी सादर करतील त्याची तपासणी आपल्या संस्थेत तपासणी समिती नियुक्त करुन शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे व खालील मार्गदर्शक तत्वानुसार तपासून घेऊन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावयाचा आहे.

**समितीने खालील निकषांची काटेकोरपणे तपासणी करावयाची आहे.**

१) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी सादर केलेला ऑन लाईन पध्दतीच्या अर्जाची प्रत.

२) अर्जासोबत कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र, अपत्य प्रमाणपत्र, रहीवाशी प्रमाणपत्र जोडण्यांत आले आहेत याची खात्री करण्यांत यावी.

३) रेशन कार्डाचे पहिले व शेवटच्या पानांची साक्षांकीत छायाप्रत (शक्यतो प्राचार्यांनी साक्षांकीत केलेली असावी )

४) सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला मूळ प्रत घ्यावी जर एकाच वेळेस एकाच कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांनी ईबीसी साठी प्रस्ताव दाखल केला असेल अशा वेळी दुस-या अपत्याने जेथे प्रवेश घेतला आहे त्या संस्थेच्या संस्था प्रमुखांनी दाखला साक्षांकीत करावा. (**सक्षम अधिकारी म्हणजे तहसीलदार/ नायब तहसीलदार उत्पन्न मर्यादा रु.१ लाख / रकमेच्या आत असणे आवश्यक राहील )**

५) तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे अशाच विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील. एमकेबी (महाराष्ट्र कर्नाटक बॉर्डर) विद्यार्थ्यास सदर *योजना लागू राहणार नाही.*

६) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

७) अभिमत विद्यापीठांना ही सवलत लागू राहणार नाही.

८) अनुतीर्ण विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहणार नाही.

९) ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी किंवा १२ उत्तीर्ण/किंवा अनुतीर्ण होऊन पदविका अभियांत्रिकी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे **अशा विद्यार्थ्यांना जर त्यांनी सदर सवलत यापूर्वी घेतली असेल तर तितकी वर्ष अशा विद्यार्थ्यांना ईबीसी सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.**

१०) **ज्या विद्यार्थ्यांनी १२ वी नंतर फार्मसी पदविका/पदविका थेट द्वितीय वर्ष अभियात्रिकी /पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी/आर्किटेक्चर पदवी/ अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे परंतु विद्यार्थ्याने जर बारावीच्या पुढील शिक्षण घेतले असल्यास पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नाही असे प्रमाणपत्र बारावी नंतरच्या कॉलेज कडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.**

११) एस.एस.सी / एच.एस.सी. /पदवी /पुर्वीच्या वर्षी घेत असलेल्या अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण/ए.टी.के.टी. गुणपत्रिका साक्षांकित प्रत असणे आवश्यक.

१२) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता शिक्षण शुल्क भरल्याची पावती (पूर्ण फी/पार्टपेमेंट केल्याची पावती.

१३) विद्यार्थी हा जर चौथे अपत्य असेल तर त्यास ईबीसी मंजूर करु नये याबाबत पुरावा रेशन कार्डाची साक्षांकीत प्रत तपासावी.

१४) शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेली शिक्षण शुल्क आदेशाची साक्षांकीत प्रत (प्रस्तावात मागणी केलेल्या प्रत्येक वर्ष निहाय )

१५) अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल प्रमाणपत्र) साक्षांकीत प्रत.

१६) **ज्या पदवी /पदविका संस्था शासनाच्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी नाहीत अशा संस्थांचे अर्ज तपासणी करण्यांत येऊ नये.**

१७) ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर (Institute level) रिक्त जागांवरील प्रवेश (Against Cap) प्रवेशित विद्यार्थ्यांना ई.बी.सी. मंजूर करण्यांत येऊ नये.

१८) वडील हयात असतील तर वडीलाचे उत्पन्न दाखलाच आवश्यक व विभक्त कुटुंब असेल तर घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत आवश्यक, वडील हयात नसतील तर वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र सादर करुन घ्यावे.

१९) तपासणी केंद्राने जर एखादा अर्ज नामंजूर केला असेल तर तो कोणत्या कारणास्तव नामंजूर केला आहे . संबंधीत अर्जावर तसा शेरा मारण्यांत यावा. **नामंजूर अर्जाबाबतची माहिती संस्थेने तात्काळ संबंधीत विद्यार्थ्यास लेखी स्वरुपात दयावयाची आहे.**

२०) सदर ईबीसी अर्ज तपासणी करुन झाल्यानंतर सर्व अर्ज संस्थेकडे परत पाठवावेत. सदरचे अर्ज संस्थेने विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम पूर्ण होई पर्यंत जतन करुन ठेवावेत. तसेच विभागीय कार्यालय/ संचालक, कार्यालयास आवश्यकता भासल्यास अर्जाची मागणी करण्यांत येईल तेव्हा ते या कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

२१)ईबीसी मागणी करणा-या सर्व विद्यार्थ्यांचे बँक खाते **राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडणे अनिवार्य** आहे. तसे प्रमाणपत्र संबधीत संस्थेच्या प्राचार्यकडून घ्यावे

२२)शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता सादर केलेले ऑनलाईन अर्जच फक्त तपासावेत

आर्थिक मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे अर्ज तपासणी करीता आपल्या स्तरावर समिती गठीत करण्यांत येऊन अर्ज तपासणी काम करावयाचे आहे. सदर समितीमधील सदस्य खालील प्रमाणे राहतील.

१. प्राचार्य/ संचालक :- अध्यक्ष

२. प्रशासकीय अधिकारी /प्रबंधक :- सदस्य

३. लेखा विभागातील एक कर्मचारी / विद्यार्थी विभागातील एक कर्मचारी :- सदस्य

वरील सर्व निकषांची काटेकोरपणे तपासणी करुन मगच अहवाल विहीत नमुन्यात सादर करावा. तसेच संस्थेच्या अहवालावर **Checked and found correct** असा शेरा मारुन खाली समितीच्या सर्व सदस्यांच्या सहया करणे अनिवार्य आहे.. आपल्याकडे नमुद केलेल्या सर्व संस्थांची ईबीसी अर्जाची तपासणी दिनांक १६/१/२०१६ पासून ते २५/१/२०१६ पर्यत पूर्ण करावयाची आहे. आपल्या संस्थेचा एकत्रित अहवाल या कार्यालयास दिनांक ३०/१/२०१६ पूर्वी सादर करण्यांत यावा.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :-

१. प्राचार्य, सर्व अशासकीय विनाअनुदानित पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था प्रमुखांना असे कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केलेल्या आपल्या जिल्हयामधील शासकीय तंत्रनिकेतन,अभियांत्रिकी/शासकीय अनुदानित संस्था/यांचेकडून आपल्या संस्थेचे ईबीसी प्रस्तावाची छाननी दिनांक १५/१/२०१६ पूर्वी संर्बधीत शासकीय तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी/अनुदानित संस्था यांचेशी दूरध्वनीद्वारे संपर्क करुन तपासणीचा दिनांक निश्चित करुन घेऊन अर्ज तपासणीचे कामपूर्ण करुन घेण्यांत याबे तद्नंतर येणा-या संस्थांचे अर्ज तपासणी केली जाणार नाही. याची सर्व संस्थांप्रमुखांनी नोंद घ्यावी. तसेच बजेटवर तपासणी अधिका-यांचा **Checked and found correct** असा शेरा घेणे अनिवार्य आहे.

२. प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**ईबीसी प्रस्तावांची छाननी करुन घेण्याबाबतचा तक्ता शैक्षणिक वर्ष २०१५-१६ अर्ज तपासणी केंद्र**
**दिनांक १६/१/२०१६ ते २५/१/२०१६**

| **तपासणी केंद्राचे नांव पुणे जिल्हा** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
|---|---|
| शासकीय तंत्रनिकेतन, पुणे ४११ ०१६. (दूरध्वनी क्रमांक २५६५७९०७) | सर्व पदविका तंत्रनिकेतने, (आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून) |
| कुसरो वाडीया इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे (दूरध्वनी क्रमांक २६१६४८१४/२५) | सर्व विना अनुदानित हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी पदविका /पदवी, औषधनिर्माणशास्त्रपदवी/पदविका,वास्तुशास्त्र पदवी |
| शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२०/२५५०७०००/२५५०७१०२/१०१) | सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी **(आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून)** |
| महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टैक्नॉलॉजी, पुणे (दूरध्वनी क्रमांक २५६७७१८९) | पदव्युत्तर पदवी व्यवस्थापन संस्था एमबीए/एमसीए (आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून) |
| **तपासणी केंद्राचे नांव आंबेगांव तालुका/जुन्नर,खेड,तालुका** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
| शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२१३३/२२५८०१) | अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था **फक्त आंबेगांव, जुन्नर, खेड तालुक्यामधील संस्था** |
| शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२१३३/२२५९००/२२५९०१) | अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था **फक्त आंबेगांव, जुन्नर, खेड तालुक्यामधील संस्था** |
| **सातारा जिल्हा तपासणी कार्यालय** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
| शासकीय तंत्रनिकेतन, कराड (दूरध्वनी क्रमांक ०२१६४/२७२९६२) | सातारा जिल्हयामधील सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था |
| शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | सातारा जिल्हयामधील सर्व पदवी अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र पदवी, पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए संस्था |
| शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड | सातारा जिल्हयामधील सर्व पदवी/पदविका औषधनिर्माणशास्त्र संस्था |
| **सोलापूर जिल्हा तपासणी कार्यालय** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
| शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर (०२१७/२६५३९२५) | सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए |
| **कोल्हापूर जिल्हा तपासणी कार्यालय** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
| शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर (दूरध्वनी क्रमांक ०२३१/२६५३९२५) | सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए |
| **सांगली जिल्हा तपासणी कार्यालय** | **तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था** |
| शासकीय तंत्रनिकेतन, मिरज दूरध्वनी क्र.०२३३/२२३१२६९ | सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए |

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.